दुरध्वनी क्र. 022 - 2261 8987
022 - 2270 8738
Email ID : supt.statunit@gmail.com

सांख्यिकी कक्ष,
फोर्ट,
मुंबई - ४०० ०३२.

## UDSTAT/ICD/2015-16/274/of 2016

परिपत्रक :-

विषय : १) मानव संसाधन विकास, मंत्रालय, विकसित अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण (AISHE) कार्यक्रम शै.व. २०१४-१५ व २०१५-१६.
२) उच्च शिक्षण संचालनालय विकसित (MIS) कार्यक्रम शै.व. २०१५-१६.
३) मुंबई विद्यापीठ विकसित विद्यार्थी संख्या (**Students on Roll**) कार्यक्रम शै.व. २०१४-१५ व २०१५-१६.

संदर्भ : १) क्रमांक उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०१५-१६/६९१, दिनांक २०/१/२०१६.

उपरोक्त विषय व संदर्भित पत्रानुसार मुंबई विद्यापीठातील सर्व संलग्नित महाविद्यालये व संस्था यांचे प्राचार्य/संचालक यांचे लक्ष वेधू इच्छितो की -

सदर पत्रानुसार राज्यातील जिल्हानिहाय महाविद्यालयामधील शैक्षणिक वर्षे २०१४-१५ व २०१५-१६ या वर्षाकरीता **AISHE (All India Survey on Higher Education)** मानव संसाधन विकास, मंत्रालय, नवी दिल्ली, निर्मित, **MIS (Management Information System) उच्च शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण विभाग, पुणे, निर्मित आणि Students on Roll** (विद्यार्थी संख्या) **मुंबई विद्यापीठ विकसित कार्यक्रम** अशा विविध कार्यक्रमाच्या माध्यमातील कार्यशाळेचे व बैठकीचे आयोजन हे **संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे, यांच्या आदेशान्वये बुधवार, दिनांक २७ जानेवारी, २०१६ रोजी दुपारी ठिक २.०० वा. मुंबई विद्यापीठ, दिक्षांत सभागृह, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२, येथे आयोजित केलेली आहे.**

संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे, यांनी दिनांक १६ जानेवारी, २०१६ रोजी राज्यातील सर्व विद्यापीठातील नोडल अधिकारी यांची सर्वेक्षणाच्या सन २०१४-१५ चे प्रलंबित व सन २०१५-१६ चे प्रगतीपर कामाचा आढावाबाबत सामुहिक बैठक त्यांच्या पुणे येथील दालनात आयोजित केलेली होती. त्या बैठकीमध्ये त्यांच्या अधिपत्याखालील AISHE आणि MIS बाबत डाटा अपलोड करण्याविषयी चर्चा करण्यात आली. सर्व संलग्नित महाविद्यालये व संस्था यांना सदर डाटा अपलोड करण्याविषयी अनिवार्य आहे अशा महत्वपुर्ण सुचना आपल्या पर्यंत पाठविण्यात याव्यात अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत.

सदर कार्यशाळेसाठी श्री. डॉ. धनराज माने, संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे, श्री. एस.पी. भांडेकर, सांख्यिकी अधिकारी, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे, श्री. अतुल भनगे, सहायक संशोधन अधिकरी, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व त्याचप्रमाणे मुंबई विद्यापीठातील श्री. डॉ. एम.ए. खान, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, डॉ. अनिल पाटील, संचालक, महाविद्यालय विद्यापीठ विकास मंडळ, मुंबई विद्यापीठ व नोडल अधिकारी, मुंबई विद्यापीठ असे एकंदरीत वरीष्ठ अधिकरी वर्ग उपस्थित राहून सर्व संलग्नित महाविद्यालयातील व संस्थेतील प्राचार्य/संचालक व त्यांचे नोडल अधिकारी यांना संबंधित विषयाबाबत योग्य ते मार्गदर्शन करणार आहेत.

तरी सदर कार्यशाळेकरीता व बैठकीसाठी **बुधवार, दिनांक २७ जानेवारी, २०१६ रोजी दुपारी ठिक २.०० वा. मंबई विद्यापीठ, दिक्षांत सभागृह, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२,** येथे उपस्थित राहणे अनिवार्य आहे. अन्यथा होणा-या कार्यालयीन कारवाईस प्राचार्य व संचालक या नात्याने आपली सर्वस्वी जबाबदारी राहील, याची आपण योग्य ती नोंद घ्यावी, ही विनंती.

नोडल अधिकारी,
**(AISHE/MIS CELL)**

दिनांक- २१/१/२०१६

प्रत माहिती करीता रवाना :-
१) संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१.
२) सहसंचालक,(उच्च शिक्षण),मुंबई विभाग,एलफिस्टन तंत्रविद्यालय आवार,महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.
३) कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०००३२.
४) संचालक, महाविद्यालय विद्यापीठ विकास मंडळ, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०००३२
५) प्रभारी परीक्षा नियंत्रक, महात्मा ज्योतीराव फुले भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.
६) उपकुलसचिव, नाव नोंदणी विभाग, मुंबई विद्यापीठ, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.
७) उपकुलसचिव, पदवीपूर्व व पदव्युत्तर विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०००३२